ePaper
| वर्ष - 6 | अंक - 49 | UDYAM-MH-26-0158827 |
# महाईन्यूज™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 24 मे 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## संभाजीराजेंना राज्यसभेवर पाठवण्यासाठी मराठा संघटनांकडून शिवसेना आमदारांकडे जोरदार लॉबिंग



### आतील पानांत


- अनेकांचे राजकीय भवितव्य घडणार किंवा बिघडणार
- वायसीएमएचमध्ये एमडी मायक्रोबायोलॉजीचा नवीन अभ्यासक्रम
- संभाजीराजेंनी शिवसेनेची ऑफर...




भाजपवाले आंदोलनाच्या नावाखाली इव्हेंटच जास्त करत असतात. भाजपने संभाजीनगरात आधी औरंगजेबाच्या थडग्याचा इव्हेंट केला. तो संपला नाही तोच, पाण्याच्या प्रश्नावर जलआक्रोश मोर्चाचे आयोजन केले होते. जलआक्रोश मोर्चात लोकांची पाण्यासाठी सुरु असलेली लोकांची तडफड दिसणे अपेक्षित होते. पण इथे एखादी शोभायात्रा निघावी व आनंद उत्सव व्हावा असेच वातावरण होते.

- **संजय राऊत,** शिवसेना नेते

पुढील वाटचाल करत असताना काँग्रेस पक्षात राहून जे मी मिळवू शकलो नाही ते सर्व मिळवायचं आहे. मी त्याच मार्गावर चालणार असून गुजरातमधील जनतेच्या भल्यासाठी काम करणार आहे, "मी गेल्या सात वर्षांपासून राजकारणात आहे. काँग्रेस गेल्या अनेक वर्षांपासून सत्तेत नाही. गुजरातमधील जनतेला काँग्रेस पक्ष आवडत नसून त्यांना स्वीकारण्यास ते तयार नाहीत. त्यांची पसंती भाजपाला आहे. पुढील १० दिवसांत माझा निर्णय सर्वांसमोर असेल,"

- **हार्दिक पटेल**



## पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक 2022

# आरक्षण सोडत 31 मे रोजी; इच्छुकांचे देव पाण्यात!

### राज्य निवडणूक आयोगाचे आदेश : प्रा. रामकृष्ण मोरे सभागृहात होणार सोडत

**। पिंपरी । महाईन्यूज ।**

आगामी महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी येत्या 31 मे रोजी आरक्षण सोडत होणार आहे. सोडतीनंतर प्रभागातील लढतींचे चित्र स्पष्ट होणार आहे. राज्य निवडणूक आयोगाकडून आरक्षण सोडतीबाबतचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. तसेच, १ जून ते ६ जून रोजी प्रभागनिहाय आरक्षण निश्चितीबाबत हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी आहे. हरकती व सूचनांचा विचार करून १६ जून रोजी अंतिम आरक्षण जाहीर करण्यात येणार आहे.

महापालिकेचे एकूण ४६ निवडणूक प्रभाग असणार आहेत. या प्रभागामधून १३९ नगरसेवकांना मतदार निवडून देतील. त्यातील ५० टक्के जागांवर महिला नगरसेविका असतील. १३९ पैकी अनुसूचित जातीसाठी २२ (महिलांसाठी ११), अनुसूचित जमातीसाठी तीन (महिलांसाठी दोन), तसेच खुला ११४ (महिलांसाठी ५७) जागा असतील. ४६ पैकी कोणता प्रभाग कोणत्या प्रवर्गासाठी राखीव असेल, हे येत्या मंगळवारी निश्चित केले जाणार आहे.

महापालिका प्रशासन चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात



आरक्षण सोडत घेण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्याबाबत महापालिका प्रशासनाकडून लवकरच माहिती दिली जाणार आहे.

महापालिका हद्दीत २०११ साली असलेल्या लोकसंख्येचा आधार घेऊन निवडणुकीसाठी प्रभाग रचना करण्यात आळी आहे. त्यावेळी एकूण १७ लाख २७ हजार ६९२ लोकसंख्या होती. त्यामध्ये अनुसूचित जातीच्या २ लाख ७३ हजार ८१० आणि अनुसूचित जमातीच्या ३६ हजार ५३५ लोकसंख्येचा समावेश आहे. त्यानुसार महापालिकेचे ३९ निवडणूक प्रभाग तयार करण्यात आले असून, तीन सदस्यीय प्रभाग रचनेनुसार नगरसेवकांची संख्या एकूण १३९ असणार आहे. त्यातील २२ जागा अनुसूचित जातीसाठी, तीन जागा अनुसूचित जमातीसाठी राखीव आहेत.

यंदा ओबीसी आरक्षण नसणार आहे. त्यामुळे उर्वरित ११४ जागा खुल्या असतील. प्रत्येक प्रभागात महिलांसाठी ५० टक्के राखीव जागा असतील.

### महिला राखीव जागांसाठी लॉटरी...

➡ ओबीसी आरक्षण नसल्यामुळे आरक्षण सोडतीच्या दिवशी फक्त अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि महिलांसाठी राखीव जागांसाठी सोडत काढण्यात येईल. ज्या प्रभागाच्या एकूण लोकसंख्येच्या तुलनेत अनुसूचित जातीच्या लोकसंख्येची टक्केवारी जास्त असेल, अशा प्रभागापासून सुरूवात करून २२ प्रभागातील १ जागा अनुसूचित जातीकरिता राखीव ठेवण्यात येणार आहे. त्याच पद्धतीने अनुसूचित जमातीसाठी राखीव तीन जागा आरक्षित केल्या जाणार आहेत. महिलांच्या ५० टक्के राखीव जागांसाठी चिठ्ठ्या काढल्या जातील.

# दुर्मिळ "पॅराड्युओडेनल" हर्निआ आजारावर यशस्वी शस्त्रक्रिया

### पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या थेरगाव येथील नवीन रुग्णालयामध्ये शस्त्रक्रिया

**। पिंपरी । महाईन्यूज ।**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या थेरगाव येथील नवीन रुग्णालयामध्ये 'पॅराड्युओडेनल हर्निया' या अत्यंत दुर्मिळ आणि गंभीर आजारावर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नवीन थेरगाव येथील रुग्णालयामध्ये गेल्या आठवड्यात प्रचंड पोटदुखी अशी



समस्या असलेल्या 38 वर्षीय महिला उपचारासाठी आल्या होत्या. गेल्या पाच ते सहा वर्षांपासून त्यांना हा त्रास होत होता.

या त्रासातून मुक्ती मिळावी म्हणून अनेक ठिकाणी त्यांनी याबाबत उपचार देखील घेतले होते. मात्र अचूक निदान न झाल्यामुळे त्यांच्यावर व्यवस्थित उपचार होत नव्हते. अखेरीस त्या महापालिकेच्या थेरगाव येथील रुग्णालयात डॉक्टरांना भेटल्या. प्राथमिक उपचार केल्यानंतर त्यांच्या काही तपासण्या करण्याचा निर्णय डॉक्टरांनी घेतला. (पान 2 वर)

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या थेरगाव येथील रुग्णालयामध्ये ही अवघड शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली आहे. यामुळे रुग्णाचा प्राण वाचला . शिवाय मोठ्या त्रासातून त्यांना दिलासा मिळाला आहे . गेल्या पाच ते सहा वर्षांपासून त्या या आजारामुळे प्रचंड वेदनांमधून जात होत्या. अनेक ठिकाणी उपचार करून देखील त्यांना या त्रासातून मुक्ती मिळाली होती. महानगरपालिकेच्या दवाखान्यांमध्ये अत्यंत दुर्मिळ प्रकारची ही यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. नवीन थेरगाव रुग्णालयातील ही पहिली मोठी आणि यशस्वी शस्त्रक्रिया असून, गेल्या पाच महिन्यात नवीन हॉस्पिटल सुरू झाल्यापासून साधारण ६०० हुन शस्त्रक्रिया या ठिकाणी करण्यात आले आहेत

- **डॉ. कांचन वायकुळे,** सर्जन

## 14 महापालिकांत राखीव जागांसाठी 31 मे रोजी सोडत काढणार

# अनेकांचे राजकीय भवितव्य घडणार किंवा बिघडणार!

## पुणे पालिकेत महिलांसाठी 87 जागा

।पुणे ।महाईन्यूज।



राज्य निवडणूक आयोगाने मुंबईसह 14 महापालिकेतील निवडणुकांसाठी पावले टाकण्यास सुरवात केली आहे. त्यानुसार पुणे महापालिकेची अंतिम प्रभाग रचना जाहीर झाल्यानंतर आता ३१ मे रोजी ५० टक्के महिला आरक्षणासाठी सोडत काढली जाणार आहे. तीन सदस्यांचा एक प्रभाग असल्याने २९ प्रभागांमध्ये दोन जागा या महिलांसाठी आरक्षित असणार आहेत. त्यामुळे अनेकांचे भविष्य टांगणीला लागेल आहे.

पुणे महापालिकेच्या निवडणुकीत तीन सदस्यांचा एक प्रभाग आहे. ५८ प्रभागांपैकी ५७ प्रभागात तीन सदस्य आहेत. तर एका प्रभागात दोन सदस्य आहेत. १७३ जागांपैकी 87 जागा या महिलांसाठी आरक्षीत आहेत. यामध्ये १२ जागा अनुसूचित जातीसाठी आणि ए जागा अनुसूचित जमातीसाठी आरक्षित असणार आहेत. राज्य निवडणूक आयोगाने १३ मे रोजी पुणे महापालिकेची अंतिम प्रभाग रचना जाहीर केली. त्यामध्ये प्रारूप प्रभाग रचनेतील ३२ प्रभागांमध्ये बदल झालेले आहे. त्यामुळे अनेक प्रभागांमधील राजकीय गणित बदलले आहेत. त्यानंतर २०११ च्या लोकसंख्येला आधार माणून अनुसूचित जाती व जमातीचे आरक्षण असलेले २५ प्रभाग कोणते याचीही यादी संकेतस्थळावर जाहीर केली. मात्र, महिलांचे आरक्षण कधी जाहीर होणार याबाबत स्पष्टता नव्हती. राज्य निवडणूक आयोगाने महिला आरक्षणाची सोडत जाहीर करण्याचे वेळापत्रक जाहीर केले असून, त्याचे पत्र पुणे महापालिकेला मिळाले आहे.

### आकडे बोलतात

- एकूण प्रभाग ५८
- एकूण सदस्य - १७३
- महिलांसाठी आरक्षीत - ८७
- तीन पैकी जागा दोन महिलांसाठी आरक्षीत असेलेल प्रभाग - २९

### असा असेल सोडतीचा कार्यक्रम

- २७ मे - सोडत काढण्यासाठी प्रसार माध्यमांद्वारे नागरिकांना माहिती देणे
- ३१ मे - अनुसूचित जाती, जमाती, व सर्वसाधारण महिला यांच्या आरक्षित जागा निश्चीत काढण्यासाठी सोडत काढणे
- १ जून - सोडतीनंतर प्रभाग निहाय आरक्षणाचे प्रारूप प्रसिद्ध करणे
- १जून ते ६ जून - प्रभागनिहाय आरक्षणावर हरकती व सूचना मागविणे
- १३ जून - प्रभाग निहाय हरकती व सूचनांवर विचार करून अंतिम आरक्षण परिशिष्ट - ड मधील नमुन्यात राजपत्रात सादर करणे.

## महाराष्ट्राचे कुलदैवत जेजुरी गडाचे सौंदर्य बहरणार

### विकास आराखड्याला राज्य सरकारची मंजुरी



। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी ।

अखंड महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या जेजुरी तीर्थक्षेत्राचे जतन आणि संवर्धन विकास आराखड्याच्या पहिल्या टप्प्याला मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज मान्यता दिली. या विकास आराखड्या अंतर्गत मंदिराच्या संकुलाचे संवर्धन, परिसराचा विकास. येणाऱ्या भाविकासाठी सोयीसुविधा, जेजुरी आणि आसपासच्या ऐतिहासिक वारसा स्थळाचे जतन आणि संवर्धन करण्यात येणार आहे. यासंदर्भात झालेल्या बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण, नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे, बारामती लोकसभा मतदार संघाच्या खासदार सुप्रिया सुळे, पुरंदरचे आमदार संजय जगताप हे उपस्थित होते. पहिल्या टप्प्यात सुमारे एकशे दहा कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहे. या विकास आराखड्या अंतर्गत जेजुरी तीर्थत्रेत्राच्या परिसराचा विकास होणार आहे. मात्र, त्याच बरोबर यामध्ये गडाची ही डागडुजी होणार असल्याने जेजुरी गडाच्या सौंदर्यात वाढ होणार आहे.

### 110 कोटी रुपयाच्या खर्चाला मान्यता

मंदिराचे काम, पूर्व आणि उत्तर पायरी मार्ग, दीप माळी, कमाण यांची पूर्ण डाकडूजी करण्यात येणार आहे. या कामासाठी राज्य सरकारच्या वतीने पहिल्या टप्प्यात ११० कोटी रुपयाच्या खर्चाला मान्यता दिली आहे, अशी माहिती देवस्थानचे विश्वस्त संदीप जगताप यांनी दिली.

## दुर्मिळ "पॅराड्युओडेनल" हर्निआ आजारावर यशस्वी शस्त्रक्रिया

(पान 1 वरुन)

या तपासण्यांमधून त्यांना अतिशय दुर्मिळ प्रकार असलेला पॅराड्युओडेनल हर्निआ झाल्याचे निदान समोर आले. हा हर्निआ आजारातील अत्यंत दुर्मिळ प्रकार असून हर्निआ आजारात केवळ ०.९ टक्के लोकांना या त्रासाला सामोरे जावे लागते. हर्निआ शरीराची अशी अवस्था आहे. ज्यात शरीराचा एक अवयव किंवा भाग दुसऱ्या एखाद्या नाजूक अवयवातून किंवा उघड्या जागेतून त्याच्या भोवतीच्या स्नायूमध्ये किंवा मऊ तंतूमध्ये ढकलला जातो. प्राथमिक अवस्थेत उपचार न केल्यास क्वचित् रुग्णाचा मृत्यू ही संभवू शकतो.

त्यामुळे संबंधित महिला रुग्णांच्या बाबत कोणतेही वेळ न दवडता त्यांच्यावर शस्त्रक्रिया करून त्यांना या त्रासातून मुक्त करण्याचा निर्णय डॉक्टरांनी घेतला. 17 मे रोजी तीन तास ही शस्त्रक्रिया करण्यात आली. यामध्ये सर्जन डॉ. कांचन वायकुळे, डॉ. ज्ञानेश पाटील, डॉ रोशन किनोलकर, डॉ. प्रतीक्षा कोलते यांनी रुग्णाची शस्त्रक्रिया केली. भूलतज्ञ म्हणून डॉ. मनीष पवार डॉ. नेहा पाटील, डॉ. शेफिया शेख यांनी काम पाहिले.तसेच यामध्ये मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच नर्स प्रणाली गायकवाड, सरला चव्हाण, वॉर्ड बॉय जयवंत गायकवाड हे देखील टीममध्ये सहभागी होते.

याबाबत मुख्य सर्जन डॉ. कांचन वायकुळे यांनी माहिती दिली. त्या म्हणाल्या पॅराड्युओडेनल हर्निया ही अत्यंत दुर्मिळ आणि निदान करणे कठीण आहे. यात जागरूकता आवश्यक आहे, कारण त्वरित शस्त्रक्रिया, उपचारांशिवाय मृत्यूचे प्रमाण जास्त असू शकते.ही एक दुर्मिळ जन्मजात विसंगती आहे. ड्युओडेनम आणि लहान आतडे मध्यरेषेच्या उजवीकडे किंवा डावीकडे, कोलनच्या मेसेंटरीच्या मागे, पेरीटोनियमने रेषा असलेल्या थैलीमध्ये अडकतात. त्यातून पुढे रुग्णाला गुंतागुंत वाढत जाते.

## महाआघाडी आणि अमोल कोल्हेंमुळे बैलगाडा शर्यती सुरू झाल्या

### खासदार सुप्रिया सुळे यांचे कौतुकोद्गार

। खेड-शिवापूर । महाईन्यूज । प्रतिनिधी ।



"बैलगाडा शर्यती सध्या सुरू झाल्या असून आज आपण सर्व बैलगाडा शर्यतींचा आनंद घेत आहोत. त्याचे श्रेय महाविकास आघाडी आणि खासकरून खासदार अमोल कोल्हे (dr Amol Kolhe) यांचे आहे," असे मत खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केले. हवेली तालुक्यातील कोंढणपूर येथे खडकवासला विधानसभा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे उपमुख्यमंत्री केसरी बैलगाडा शर्यतींचे आयोजन करण्यात आले होते. उपमुख्यमंत्री केसरी बैलगाडा शर्यतीत २०० बैलगाडे सहभागी झाले होते. बैलगाडा शर्यती पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. या बैलगाडा शर्यतीस सुळे यांनी भेट दिली, यावेळी त्या बोलत होत्या.

खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या की, "बैलगाडा शर्यती सुरू होण्यासाठी राज्यातून महाराष्ट्र विकास आघाडी सरकारने प्रयत्न केले. दिल्लीत खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी त्याबाबत पाठपुरावा केला. त्यामुळे बैलगाडा शर्यती सुरू झाल्या असून त्याचे श्रेय महाराष्ट्र विकास आघाडी आणि खासकरून खासदार कोल्हे यांचे आहे. बैलगाडा शर्यती पाहण्याचा आनंद घेतानाच आपण शिस्त आणि सुरक्षितता याचीही काळजी घेतली पाहिजे, असे आवाहनही त्यांनी या वेळी केले.

### एकूण 200 बैलगाडे धावले

या बैलगाडा शर्यतीत एकूण २०० बैलगाडे धावले. त्यात प्रथम क्रमांक- सरदार वादळ, दुसरा क्रमांक- बाबाराजे जगताप तेजा आणि शंकर 1130, तिसरा क्रमांक- भारत आणि सुंदर, चौथा क्रमांक- निशाणा तेजा वडकी, पाचवा क्रमांक-चंदर (शिंदेमाल), सत्या सहावा क्रमांक-अशोक जोशी बलमा आणि अशोक योगी बलमा यांनी पटकावला.

खासदार सुप्रिया सुळे यांच्यासोबत माजी जिल्हा परिषद सदस्य नवनाथ पारगे, जिल्हा परिषद सदस्या पूजा पारगे, माजी सभापती शुक्राचार्य वांजळे, संदीप मुजुमले, नगरसेवक सचिन डोडके, काका चव्हाण, अशोक गोगावले, सायली वांजळे, जितेंद्र कोंडे उपस्थित होते.

### पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाअंतर्गततीन जागांसाठी नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यात येणार

# वायसीएमएचमध्ये एमडी मायक्रोबायोलॉजीचा नवीन अभ्यासक्रम

### पाच लाख रुपये शुल्क राज्य सरकारच्या वैद्यकीय शिक्षण आणि औद्रव्ये विभागाकडे भरण्यात येणार




## संस्थेची सक्षमता तपासणी करण्यात येणार

त्यानुसार या एका अभ्यासक्रमाकरिता पाच लाख रुपये वैद्यकीय शिक्षण, प्रशिक्षण संशोधन या लेखाशिर्षावर भरल्यानंतरच वायसीएम रुग्णालय पदव्युत्तर संस्थेची सक्षमता तपासणी करण्यात येणार आहे. त्यासाठी ही रक्कम वैद्यकीय शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन या नावाने राज्य सरकारच्या वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाकडे भरावी लागणार आहे. हा खर्च पी.जी.आय., वायसीएमएच, पीसीएमसीकरिता विविध सरकारी नियामक संस्था व विद्यापीठांचे शुल्क भरणे या लेखाशिर्षावरील 1 कोटी 10 लाख रुपये तरतुदीतून करण्यात येणार आहे.

| पिंपरी | महाईन्यूज |

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयात पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाअंतर्गत एमडी मायक्रोबायोलॉजी या तीन जागांसाठी नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. त्यासाठी पाच लाख रुपये शुल्क राज्य सरकारच्या वैद्यकीय शिक्षण आणि औद्रव्ये विभागाकडे भरण्यात येणार आहे.

महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयात पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. नाशिक येथील महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत त्यास परवानगी मिळाली आहे. शैक्षणिक वर्ष 2020-21 करिता विद्यार्थ्यांना प्रवेशक्षमता मंजुरीही दिली आहे. त्यामध्ये मानसोपचारशास्त्र (3), विकृतीशास्त्र (3) बालरोग (4), अस्थिरोग (4), खीरोग व प्रसूतिशास्त्र (3), कान नाक-घसा (3), भूलशास्त्र (4), मेडिसीन (6) आणि जनरल सर्जरी (6) या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांना प्रवेश क्षमता मंजुरी देण्यात आली आहे.

राज्य सरकारच्या वैद्यकीय शिक्षण आणि औषध द्रव्ये विभागाच्या 25 फेब्रुवारी 2022 रोजी पत्रानुसार वायसीएम रुग्णालय पदव्युत्तर संस्थेत एमडी मायक्रोबायोलॉजी हा नवीन अभ्यासक्रम तीन विद्यार्थी प्रवेशक्षमतेसह सुरु करण्याच्या अनुषंगाने सरकारकडे शिफारस प्राप्त झाली आहे. या नवीन अभ्यासक्रमांच्या प्रस्तावांकरिता प्रस्ताव छाननी शुल्क निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार प्रत्येक पदव्युत्तर अभ्यासक्रमांकरिता प्रतिविषय पाच लाख रुपये इतके सक्षमता तपासणी शुल्क ठरविण्यात आले आहे.

# पिंपरी, चिंचवड, हिंजवडीत घरफोडी; दागिने, रोकड लंपास

पिंपरी चिंचवड | महाईन्यूज |



पिंपरी, चिंचवड आणि हिंजवडीत (PIMPRI CHINCHWAD BURGLARY) घरफोडी झाली. या तीनही घरफोडीत सोन्या, चांदीचे 5 लाख 70 हजार रुपयांचे दागिने, 3 लाख 70 हजारांची रोकड, 95 हजार असे 10 लाख 35 हजार रुपयांचा ऐवज लांबविला आहे.

चिंचवड येथील घरफोडी प्रकरणी विवेक विष्णुपंत मुद्देबिहाळकर (वय 59, रा. केशवनगर, चिंचवडगाव) यांनी चिंचवड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. शनिवारी मुद्देबिहाळकर हे सिंहगड येथील भावाच्या घरी गेले होते. शनिवारी मध्यरात्री चोरटे घराचा कडी-कोयंडा उचकडून घरात घुसले. चोरांनी डरुममधील 16.05 तोळे सोन्याचे दागिने, 2.05 किलो चांदीची भांडी, देवाचे चांदीचे दागीने असा 5 लाख 70 हजार रुपये किंमतीचे दागिने चोरुन नेले. चिंचवड पोलीस अधिक तपास करत आहेत.

हिंजवडी, मारुंजीतील घरफोडी (PIMPRI CHINCHWAD BURGLARY) प्रकरणी अतुल आसाराम रहाणे (वय 42) यांनी हिंजवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. रहाणे हे शुक्रवारी कुटुंबियांसह आत्याच्या मुलीच्या विवाहासाठी अहमदनगर जिल्ह्यातील राहुरीला गेले होते. चोरट्यांनी घराच्या गॅलरीचे फ्रेंच डोअर उचकटून गॅलरीत शिडी लावून घरात प्रवेश केला. लाकडी कपाट चावीच्या सहाय्याने उघडले. त्यांनी कपाटातील ड्रावरमध्ये ठेवलेली 3 लाख 70 हजार रुपयांची रोकड लांबविली. हिंजवडी पोलीस तपास करत आहेत.

पिंपरीतील घरफोडी प्रकरणी मुकेश पुनमचंद राजावत (वय 29, रा. नेहरुनगर) यांनी फिर्याद दिली. 13 मे रोजी मुकेश यांचे घर बंद होते. चोरटे कुलुप तोडून घरात घुसले. घरातील कपाटाच्या लॉकरमधील 75 हजार रुपये किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिने आणि 20 हजार रुपयांची रोकड असा एकूण 95 हजार रुपयांचा माल चोरुन नेला. पिंपरी पोलीस अधिक तपास करत आहेत.

### मनमानीपणे दंड आकारणी करून व्यापारी-प्रशासन यांच्यात वादाची परिस्थिती करू नका

# प्लॅस्टिक कारवाईबाबत व्यापाऱ्यांना विश्वासात घ्या:

### आमदार महेश लांडगे यांचे महापालिका आयुक्त राजेश पाटील यांना आवाहन

पिंपरी | महाईन्यूज

प्लॅस्टिक कॅरी बॅग बंदीच्या कारवाईबाबत व्यापाऱ्यांना विश्वासात घेवून निर्णय घ्यावा. मनमानीपणे दंड आकारणी करून व्यापारी-प्रशासन अशी वादाची परिस्थिती करू नका, असे आवाहन भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी केले आहे.

याबाबत महापालिका आयुक्त राजेश पाटील यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पर्यावरण रक्षण आणि स्वच्छ भारत अभियानाची अंमलबजावणी करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासन निश्चितपणाने



चांगले काम करीत आहे. शहरातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने प्रशासनाची भूमिका स्वागतार्ह आहे. प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर दैनंदिन व्यापार आणि व्यवहारात बंद करावा, हा निर्णय सार्वजनिक लोकहितातच आहे. मात्र, त्यासाठी व्यापारी आणि व्यावसायिकांना विश्वासात घेवून कारवाईची भूमिका घ्यावी.

गेल्या काही दिवसांपासून शहरात प्लॅस्टिक कॅरी बॅग वापरणाऱ्या व्यापाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. त्यामुळे व्यापारी आणि प्रशासनातील कर्मचारी यांच्यामध्ये वादाचे प्रसंग घडत आहेत. प्रशासन अन्यायकारकपणे कारवाई करीत आहे, असा संदेश जनमानसात जात आहे. महापालिका प्रशासनाने प्लॅस्टिक विरोधी पथक तयार केले आहे. त्याद्वारे एकाच दुकाना १० ते १५ अधिकारी अचानक धाड टाकतात आणि कॅरी बॅगची तपासणी करतात. व्यापाऱ्यांशी आणि दुकानातील कर्मचाऱ्यांशी अरेरावीने बोलतात, अशा तक्रारी पुढे येत आहेत, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

## प्लॅस्टिक कॅरी बॅग उत्पादकांवरच कारवाई करा: लांडगे

प्लॅस्टिक बॅग बंदीची आणि त्याची अंमलबजणीची प्रशासनाची भूमिका योग्य आणि नियमाला धरुन असली, तरी शहरातील व्यापारी आणि दुकानदार यांच्याकडून २ ते ५ हजार रुपयांपर्यंत दंड आकारणी केली जाते. कोविड काळात आणि लॉकडाउनच्या काळात व्यापारी, व्यावसायिक, छोटे दुकानदार यांची आर्थिक घडी विस्कळीत झाली होती. दोन वर्षांनंतर आता व्यवहार सुरळीत सुरू आहेत. अशा परिस्थितीत कॅरी बॅग वापरावरुन आर्थिक अवास्तव दंड आकारणी योग्य होणार नाही. याउलट, शहरातील व्यापारी आणि संबंधित संघटनांचे पदाधिकारी यांची विशेष बैठक घ्यावी. क्षेत्रीय कार्यालयनिहाय प्लॅस्टिक कॅरी बॅग वापराच्या बंदीबाबत जनजागृती करावी आणि विशेष म्हणजे, ज्या ठिकाणी अशा प्लॅस्टिक कॅरी बॅग उत्पादीत केल्या जातात. त्या उत्पादनावरच बंदी आणावी. कॅरी बॅग उत्पादनच बंद झाले, तर लोकांनी वापर करण्याचा प्रश्नच येणार नाही.

दुसरीकडे, शहरात कापडी बॅग वापरावर जनजागृती करावी. तसेच, दुकानदार, व्यावसायिकांनी कापडी बॅग विक्री बंधनकारक करावी, अशी आमची आग्रही मागणीही आमदार लांडगे यांनी केली आहे.

## संपादकीय »

# बुडत्याला काडीचा आधार...

***नव्या महामंदीकडे ही वाटचाल सुरू आहे, अशी रास्त भीती जगभरातील अर्थतज्ज्ञ बोलून दाखवत आहेत. अशा परिस्थितीत भारतासारख्या इंधनासाठी परावलंबी असलेल्या देशाचे कंबरडे या भाववाढीने मोडले नसते तरच नवल!***

उकळत्या लोहभट्टीजवळ दिवसभर उभ्या केलेल्या माणसाला तिथून हलवून उन्हात उभे केल्यावर त्याला जो दिलासा मिळेल, तशाच प्रकारचा दिलासा सर्वसामान्य माणसाला केंद्र व राज्य सरकारांनी पेट्रोल व डिझेलच्या अनुक्रमे उत्पादनशुल्कात व मूल्यवर्धित करात (व्हॅट) कपात केल्यामुळे मिळाला आहे. गेल्या दोन वर्षांत, त्यातही रशिया-युक्रेन युद्ध सुरू झाल्यापासून गेल्या तीन महिन्यांत जगभरात महागाईची होळी पेटली आहे. त्यात अमेरिकेसारख्या महासत्तेपासून ते जपान-युरोपपर्यंत सगळे जगच भाजून निघते आहे. नव्या महामंदीकडे ही वाटचाल सुरू आहे, अशी रास्त भीती जगभरातील अर्थतज्ज्ञ बोलून दाखवत आहेत. अशा परिस्थितीत भारतासारख्या इंधनासाठी परावलंबी असलेल्या देशाचे कंबरडे या भाववाढीने मोडले नसते तरच नवल! गेल्या तीन महिन्यांत किरकोळ व घाऊक महागाईच्या निर्देशांकांनी उच्चांक गाठले होते. एप्रिलमध्ये किरकोळ महागाई निर्देशांक ७.७९ टक्के, तर घाऊक महागाई निर्देशांक १५.०८ टक्क्यांवर पोचला होता. इंधनदरात होत असलेली वाढच या महागाईच्या मुळाशी आहे. इंधनाचे दर वाढले, की मालवाहतुकीपासून ते अन्नधान्यापर्यंत सगळ्यांची भाववाढ होते. एकदा महागाई वाढली, की मागणी कमी होते आणि त्यातून उत्पन्न घटते, असे हे दुष्टचक्र आहे. कच्च्या तेलावरचे आपले पराकोटीचे अवलंबित्व आणि तरीही आपल्या अर्थव्यवस्थेची गाडी सुरू राहण्यासाठी याच 'इंधना'ची असलेली तितकीच तीव्र आवश्यकता या चक्रव्यूहात आपण देश म्हणून पुरते फसले आहोत. त्यामुळे या परिस्थितीत आमूलाग्र बदल होत नाही, तोवरचे सगळेच उपाय हे तसे वरवरचे आणि तात्कालिक वाटतात. तरीही केंद्र सरकारने सर्वसामान्य माणसाचा अधिक अंत न पाहता, पेट्रोल व डिझेलवरचे उत्पादन शुल्क अनुक्रमे आठ व सहा रुपयांनी अशा विक्रमी रकमेने घटविले आणि त्यापाठोपाठ राज्य सरकारनेही यात फार राजकारण न आणता, आणखी करदिलासा दिला, हे महत्त्वाचे आहे. केंद्र सरकारने पंतप्रधान उज्ज्वला गॅस योजनेतील नऊ कोटी लाभार्थ्यांना घरगुती स्वयंपाकाच्या एका सिलिंडरवर दोनशे रुपये अनुदान देण्याचा निर्णयही घेतला आहे. यामुळे वाढत्या महागाईला थोडा फार तरी आळा बसेल, अशी अपेक्षा आहे.



## आनंदी सकाळ

# चैतन्यदायी 'अमृतानुभव'!

मेंदूतील कणांच्या योगाने अनेक प्रकारचे ज्ञान मस्तकात असते, म्हणून मस्तकाला ज्ञानभांडार म्हणतात. ज्ञानी लोकांच्या शरीराच्या मानाने मस्तक व मेंदूची क्षमता मोठी असते; तसेच धाडसाचे काळीज मोठे असते. हे घडलेल्या प्रसंगातून पाहू. नेपोलियनचे डोके व काळीज मोठे होते. एकाच वेळी तो पन्नास कारकुनांना बिनचूकपणे ज्याचा त्याला मजकूर सांगत असे; तसेच युद्धाचे विचार, जगाचे नकाशे पाहणे व ग्रंथ लेखनही चालू असे. तो बुद्धीच्या बळाने, शुद्धचित्त व स्थिर मनाने एकाच वेळी अनेक कामे उत्साहाने करीत असे.

आजच्या जीवनात सर्वांना मेंदूतील कणांचे सामर्थ्य प्राप्त होऊ शकते. यासाठी भगवंतांनी गीतेमध्ये सांगितलेला अभ्यास आहे. त्याला 'पंथराज' म्हणतात. तो असा,

'शांतपणे डोळे मिटून शरीर ढिले सोडले, की मणक्यातून खालून वर मेंदूकडे जाणाऱ्या लहरींमुळे सुखद अनुभूती येते. शरीर, मन प्राणशक्तीबरोबर संतुलित झाल्यामुळे प्रत्येक कृती चैतन्यशक्तीच्या इच्छेप्रमाणे चालते व 'अमृतानुभव' प्राप्त होतो.'

# उन्मत्तखोरांना चपराक वेळीच द्यायला हवी !






माजी क्रिकेटपटू आणि पंजाब काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नवज्योतसिंग सिद्धू यांनी १९८८ मध्ये केलेल्या मारहाणीत गुरनामसिंग या वयस्कर व्यक्तीचा मृत्यू झाला होता. या प्रकरणात सिद्धू यांची यापूर्वी दंड आकारून सुटका झाली होती. मात्र, गुरनामसिंग यांच्या कुटुंबीयांनी केलेल्या पुनर्विचार याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्ती ए. एम. खानविलकर आणि एस. के. कौल यांच्या खंडपीठाने पूर्वीचा निर्णय बदलून त्यांना एक वर्षाची शिक्षा सुनावली हे योग्यच केले. न्यायमूर्तींनी हा निकाल देताना म्हटले आहे, की ठार मारण्याच्या उद्देशाने हा हल्ला नव्हता; किंबहुना एखाद्यास भावनेच्या भरात मारहाण करताना त्याचा जीव गेला, असे या प्रकरणात म्हणता येणार नाही. मात्र, आपल्यापेक्षा दुप्पट वयाच्या व्यक्तीच्या डोक्यात बॅट घालताना त्याचे परिणाम काय होऊ शकतात, याची कल्पना ही आरोपीस असायलाच हवी होती. मुख्य म्हणजे खेळ किंवा इतर शारीरिक व्यायाम करणाऱ्या व्यक्तीने एखाद्यास हातानेही मारहाण केल्यास ती जीवघेणी ठरू शकते, याचा विचार करणे गरजेचे होते. अशा प्रकरणांमध्ये आरोपीस शिक्षा न केल्यास समाजात चुकीचा संदेश जाऊ शकतो. मुख्यतः अशा प्रकरणात बळी गेलेल्याच्या कुटुंबीयांना न्याय न मिळाल्याची भावना निर्माण होऊन त्यातून सूडनाट्य सुरू होऊ शकते, हे न्यायालयाचे निरीक्षण आहे. क्रिकेटच्या मैदानात वेगवान गोलंदाजांसमोर घाबरणारी व्यक्ती रस्त्यावर गाडी चालवताना झालेल्या भांडणात, आपल्यापेक्षा दुप्पट वयाच्या माणसाच्या डोक्यात मात्र दाणकन बॅट घालते, ही कृती अनावधानाने नव्हे, तर या व्यवस्थेत माझे काहीही वाकडे होणार नाही या मस्तीतूनच झालेली आहे. सिद्धू महाशयांनी नंतर पाठ केलेले वाक्प्रचार, म्हणी पोपटासारख्या म्हणत दूरचित्रवाणीवरून थोर वक्ते असल्याची स्वतःची प्रतिमा तयार केली. त्यांना मिळालेल्या या स्वस्त प्रसिद्धीमुळे त्यांना भाजपने व नंतर काँग्रेसच्या नेत्यांनी मोठमोठ्या पदांवर नेमले. पंजाब निवडणुकीपूर्वी तर काँग्रेसने आपल्याला मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार म्हणून घोषित करावे, अशी सिद्धू यांची इच्छा होती. पंजाबमध्ये पक्षाची वाताहत लावणारे एका मागोमाग एक निर्णय घेणाऱ्या काँग्रेसश्रेष्ठींचे नशीब थोर म्हणूनच हा निर्णय त्यांनी घेतला नाही. मात्र, इतक्या अविवेकी माणसाच्या पाठांतरावर भुलणाऱ्या भाजप, काँग्रेस या पक्षांच्या नेत्यांना व सिद्धू यांच्या फॅन्सनादेखील ही अप्रत्यक्ष चपराक आहे, हे लक्षात घ्यायला हवे.

# भाजपचा भाकरी फिरविण्याचा प्रयोग !

**त्रिपुरात पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर प्रस्थापितविरोधी भावनाही शांत करण्याचा उद्देश यामागे दिसतो. कोणालाही विश्वासात न घेता एकहाती सत्ता राबविण्याच्या देव यांच्या कार्यशैलीबद्दल आमदारांत नाराजी होती. दोघा आमदारांनी पक्षाला सोडचिठ्ठी देत काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता.**

त्रिपुराचे मुख्यमंत्री विप्लव देव यांना हटवून त्यांच्या जागी डॉ. माणिक साहा यांची निवड करून, भारतीय जनता पक्षाने पक्षांतर्गत गटबाजी थोपविण्याचा प्रयत्न केला आहे. कर्नाटक, गुजरात आणि उत्तराखंडामध्येही पक्षाने हाच भाकरी फिरविण्याचा प्रयोग केला होता. त्रिपुरात पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर प्रस्थापितविरोधी भावनाही शांत करण्याचा उद्देश यामागे दिसतो. कोणालाही विश्वासात न घेता एकहाती सत्ता राबविण्याच्या देव यांच्या कार्यशैलीबद्दल आमदारांत नाराजी होती. दोघा आमदारांनी पक्षाला सोडचिठ्ठी देत काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. केंद्रीय नेतृत्वाकडे देव यांच्या विरोधात अनेक तक्रारी आल्या होत्या. गेल्या काही दिवसांतील दंगलींमुळे त्रिपुरात अस्वस्थताही आहे. त्या पार्श्वभूमीवर गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन देव यांनी राजीनामा दिला आणि प्रदेशाध्यक्ष व खासदार साहा यांच्याकडे राज्याचे सुकाणू आले. दंतवैद्यक असलेले साहा हे वैद्यकीय महाविद्यालयात प्राध्यापक होते. विद्यार्थी आंदोलनातून राजकारणात आलेले साहा प्रथम काँग्रेसमध्ये होते. भाजपने राबविलेल्या 'ऑपरेशन नॉर्थ इस्ट'मध्ये त्यांनीही कमळ हाती घेतले. डाव्यांचा गड मानला गेलेल्या त्रिपुरात सत्ता मिळविण्याची




किमया भाजपने चार वर्षांपूर्वी साधली, त्यामध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघासह पक्षाच्या संघटनेचा मोठा वाटा होता. साहा यांनी या काळात प्रचारप्रमुख आणि बूथ समित्यांची जबाबदारी सांभाळली होती. सत्ता आल्यानंतर साहा यांना प्रदेशाध्यक्ष आणि गेल्याच महिन्यात राज्यसभेवर संधी देण्यात आली. देव यांचे निकटवर्तीय असले, तरी साहा हे गटातटांच्या राजकारणापासून दूर असल्याचे मानले जाते. त्यांची प्रतिमाही चांगली आहे. विधीमंडळ पक्षाच्या बैठकीत साहा यांच्या नावाला विरोध झाला आणि धक्काबुक्कीही झाली होती; त्यामुळे नाराज आमदारांना चुचकारण्याचे आव्हान त्यांच्यापुढे आहे. गेल्या निवडणुकीत गमावलेली सत्ता परत मिळविण्यासाठी कंबर कसलेले डावे पक्ष; तसेच काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेसचा सामना करून सत्ता राखण्यात ते यशस्वी होणार का, याची उत्सुकता आहे.

## ।। अभंगवाणी ।।



क्षणभरी आम्ही सोसिलें वाईट । साधिलें अवीट निजसुख ॥१॥
सांडी मांडी मागें केल्या भरोवरी । अधिक चि परी दुःखाचिया ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज »

### बेटींग करणारी टोळी अटकेत, सव्वापाच लाखाचा मुद्देमाल जप्त

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

बनावट कागदपत्रे तयार करून बनावट (BETTING GANG) सिम कार्ड घेऊन सरकारची बंदी असलेला बेटींगचा व्यवसाय करणाऱ्या पाच जणांच्या टोळीला पोलीसांनी गजाआड केले. त्यांच्याकडून 5 लाख 31 हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पिंपळे-सौदागर येथे मालपाणी इस्टेटमध्ये करण्यात आली. विनोद उर्फ बाळू बळीराम अग्रवाल (वय 44, रा. मालपाणी इस्टेट, पिंपळे-सौदागर), सनी जगदिश मंगलानी (वय 32, रा. पीडब्ल्युडी, पिंपरी), हितेश पुरण लोहाना (वय 30, रा. कापसे हाईटस, पिंपरी), रोहित उर्फ सोनू कैलास अग्रवाल (वय 21) आणि शुभम अजय जहागिरदार (वय 28, दोघे रा. मालपाणी इस्टेट, पिंपळे-सौदागर) अशी अटक केलेल्या पाच जणांची नावे आहेत. गुन्हे शाखा युनिट चारचे पोलीस नाईक मोहम्मद नदाफ यांनी सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आरोपींनी स्वत:च्या आर्थिक (BETTING GANG) फायद्यासाठी संगनमत करून बनावट कागदपत्रे तयार केली.

# संभाजीराजेंनी शिवसेनेची ऑफर नाकारल्याची चर्चा!

## काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केली प्रतिक्रिया...

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

संभाजीराजे छत्रपती यांनी राज्यसभा निवडणुकीत अपक्ष उमेदवारीची घोषणा केल्यानंतर सर्वपक्षीयांना पाठिंब्याचं आवाहन केलं. यानंतर त्यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची भेटही घेतली. मात्र, अद्याप राजकीय पक्षांकडून संभाजीराजेंना जाहीर पाठिंबा मिळालेला नाही. या पार्श्वभूमीवर शिवसेनेने संभाजीराजेंना पक्ष प्रवेश आणि उमेदवारीची ऑफर दिल्याची आणि ही ऑफर संभाजीराजेंनी नाकारल्याची चर्चा आहे. यावर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी प्रतिक्रिया व्यक्त केलीय. ते मुंबईत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर बोलत होते.

नाना पटोले म्हणाले, "संभाजीराजे आणि शिवसेनेची ऑफर हा शिवसेनेचा विषय आहे. त्यावर आम्ही बोलण्याचा प्रश्न नाही. शिवसेनेच्या वतीने ते जो उमेदवार देतील त्याला काँग्रेसचा पाठिंबा असेल. संभाजीराजेंबद्दल आम्हाला आदर आहे. आता उमेदवार निश्चित करण्याचा अधिकार शिवसेनेचा आहे. मागच्यावेळी हा अधिकार राष्ट्रवादीला दिला होता. यावेळी शिवसेनेचा आणि पुढच्यावेळी काँग्रेसचा अधिकार असेल."



### "राज्यसभा उमेदवारीचा निर्णय आम्हाला सर्वांना विश्वासात घेऊन घ्यावा"

"आत्ता शिवसेनेचा अधिकार असल्यामुळे त्यांनी कोणाला उमेदवारी द्यायची हा त्यांचा अधिकार आहे. पण आम्हाला सर्वांना विश्वासात घेऊन त्यांनी हा निर्णय घ्यावा अशी काँग्रेसची भूमिका आहे. महाविकासआघाडीच्या कोट्याचा जो निर्णय झाला त्याबद्दल मी तुम्हाला स्पष्टता दिली आहे. त्यामुळे संभाजीराजेंच्या उमेदवारीवर शिवसेनेने निर्णय घेण्याची गरज आहे. ते जो निर्णय घेतील त्याला आमचा पाठिंबा असेल," असं नाना पटोले यांनी सांगितलं.

### "ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नात महाराष्ट्राचे ॲडव्होकेट जनरल यांच्या चुका"

ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर बोलताना नाना पटोले म्हणाले, "स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुका ओबीसी आरक्षणासह व्हाव्यात अशी मागणी काँग्रेस ओबीसी सेलची व ओबीसी संघटनांची आहे. त्यामुळे मी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना त्याबाबत निवेदन दिलं आहे. आम्ही अनेकदा सांगितलं की ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नात महाराष्ट्राचे ॲडव्होकेट जनरल यांच्या चुका दिसत आहेत. मी अनेकदा याबाबत सूचना केल्या आहेत."

"काहीही असो, त्यांना ते ॲडव्होकेट जनरल हवे आहेत तर आमचा काही विरोध नाही. एजींना बदलवण्याचे अधिकार मुख्यमंत्री आणि कॅबिनेटला असतात. त्यांनी तो निर्णय घ्यायचा की नाही हा त्यांचा भाग आहे. आमचं एवढंच म्हणणं आहे की आत्ता होणाऱ्या निवडणुका ओबीसी आरक्षणासहच झाल्या पाहिजेत," असंही पटोलेंनी नमूद केलं.

---

### पेट्रोल-डिझेलचे भाव केंद्र सरकारच्या निर्णयामुळे कमी झाले

# इंधन कपात म्हणजे शुद्ध फसवणूक

## देवेंद्र फडणवीस यांची राज्य सरकारवर टीका



मुंबई । महाईन्यूज ।

केंद्र सरकारने इंधनावरील कर कपात केल्यानंतर राज्यातील महाविकास आघाडी सरकारने इंधनावरील कर कमी करण्याचा निर्णय घेतला. राज्य सरकारने पेट्रोलवरील मुल्यावर्धित करात 2.80 पैसे, तर डिझेलवरील करात 1.44 पैसे कपात केली. या निर्णयानंतर विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी राज्य सरकारवर टीका केली. त्यांनी इंधन करकपात म्हणजे शुद्ध फसवणूक असल्याचे म्हणत पेट्रोल, डिझेलचे भाव केंद्र सरकारच्या निर्णयामुळे कमी झाले आहेत, असे म्हटले आहे.

महाविकास आघाडी सरकारने राणाभीमदेवी थाटात राज्यात इंधनावरील व्हॅट कमी झाल्याची माहिती शासकीय ट्विटर हॅंडलवरून प्रसारित केली. प्रत्यक्षात ही शुद्ध फसवणूक आहे. महाविकास आघाडी सरकारने दरकपातीचा कोणताच निर्णय घेतला नाही. तर केंद्राच्या निर्णयाचा हा स्वाभाविक परिणाम आहे," असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

महाविकास आघाडी सरकारने लोकांना मुर्ख न बनविता तत्काळ पेट्रोल-डिझेल दरकपातीचा निर्णय घ्यावा, ही माझी पुन्हा मागणी आहे. लची घोषणा पाहून 'उंटाच्या तोंडात जिरे' असे मी म्हटले होते. पण, प्रत्यक्षात तर हा संपूर्ण प्रकार मे महिन्यात 'एप्रिल फूल' करणारा ठरला आहे. महाराष्ट्रात पेट्रोलवर २.०८ रुपये आणि डिझेलवर १.४४ रुपये जे कमी झाले. ते रोड अँड इन्फ्रास्ट्रक्चर सेस केंद्र सरकारने कमी केल्याने राज्याचा कर कमी झाला आहे. : काहीच करायचे नाही आणि केंद्राने घेतलेल्या निर्णयाच्या परिणामांचे सुद्धा श्रेय घ्यायचे, हे फारच गंभीर आहे, अशी टीका देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

# 'देवेंद्र फडणवीसांवर गुन्हा दाखल करा'

## जल आक्रोश मोर्चानंतर खासदार जलील यांची मागणी

औरंगाबाद । महाईन्यूज ।

भारतीय जनता पक्षाने औरंबादमध्ये जल आक्रोश मोर्चा काढला. या मोर्चात विधानसभेतील विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी पाण्याच्या प्रश्नावरून महाविकास आघाडी सरकारवर टीकेची झोड उठवली. भाजपच्या या आंदोलनावर एमआयएमचे खासदार इम्तियाज जलील यांनी निशाणा साधला आहे. भाजपच्या या मोर्चाचा पाण्याशी काहीही संबंध नसून ही सभा राजकीय सभा आहे. विधानसभेचे माजी अध्यक्ष हरीभाऊ बागडे यांनी तर पाण्याच्या प्रश्नाऐवजी औरंगजेब, संभाजी महाराज आणि नामांतराच्या मुद्यावर वक्तव्ये केली. याद्वारे त्यांनी औरंबादचे वातावरण बिघडवण्याचे काम केले. यामुळे पोलिसांनी बागडे यांच्यासह देवेंद्र फडणवीस यांच्यावर गुन्हा दाखल करून कारवाई करावी, अशी मागणी खासदार इम्तियाज जलील यांनी केली आहे.

भाजपच्या जल आक्रोश मोर्चानंतर खासदार जलील हे पत्रकारांशी बोलत होते. मोर्चासाठी परवानगी मागत असताना आम्ही केवळ पाण्यावर मोर्चा काढत असून पाणीप्रश्नावरच बोलणार आहोत, असे भाजपने पोलिसांना केलेल्या अर्जात म्हटले आहे. असे असताना तुम्हाला राजकीय सभा घ्यायची असेल तर घ्या, तुम्ही येथे राजकीय पोळी भाजून घेऊ नका. नियम सर्वांसाठी सारखे आहेत. आता पोलिसांनी यावर कारवाई करावी.



पाण्याच्या नावाखाली मोर्चा काढला आणि सभेत भलत्याच मुद्द्यांवर भाष्य केले याची दखल आता पोलिसांनी घेणे आवश्यक आहे, असेही जलील म्हणाले. जल आक्रोश मोर्चावर टीकास्त्र सोडताना खासदार जलील यांनी भाजपवर गंभीर आरोप केला. या मोर्चात सहभागी होण्यासाठी महिलांना अडीचशे रुपये आणि हंडे देण्यात आले. एक महिला या मोर्चात हंडा घेऊन नाचत होती.

भाजपच्या कार्यकाळात समांतर जलवाहिनी योजना आणली गेली. या योजनेला मी विरोध केला. यात पाण्याचा ठेका एका खाजगी कंपनीला दिला गेला होता आणि ही कंपनी भाजपची होती, असे सांगतानाच हे भाजप सांगण्याची हिंमत का दाखवत नाही, असा सवालही खासदार जलील यांनी केला. आम्ही या कंपनीकडून कमिशन घेत होतो हे सांगण्याची हिंमत भाजपने दाखवली पाहिजे असा टोलाही त्यांनी लगावला.

### देशातील विविध राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी समान नागरी कायद्याचा मुद्दा उचलला...

# देशात समान नागरी कायदा लागू करण्याबाबत भाजपशासित राज्यांतून वातावरण निर्मिती!

### राज ठाकरे यांनी पुण्यातील सभेतून नरेंद्र मोदी यांना केली होती विनंती

**नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था।**

**मनसे** अध्यक्ष राज ठाकरे यांनी पुण्यातील सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना देशात समान नागरी कायदा लागू करण्याची विनंती केली. राज ठाकरेंच्या या विनंती नंतर आता देशातील विविध राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी देखील समान नागरी कायद्याचा मुद्दा उचलून ठरला आहे. विषेशत: भाजपशासित राज्यांच्या मुख्यमंत्र्याकडून समान नागरी कायद्यावर आता भाष्य केलं जातयं. यामुळे समान नागरी कायद्या लागू करण्यासाठी देशात वातावरण निर्मिती केली जात असल्याची चर्चा सुरु झालीय.

केंद्रात मोदी सरकार आल्यापासून आत्तापर्यंत देशात जम्मू काश्मीरमधील ३७० कलम हटवणे, सीएए, राममंदिर, तिहेरी तलाक असे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. त्यानंतर आता देशात समान नागरी कायदा लागू करण्याची मागणीही जोर धरून लागलीय. तसेच या मागणीला काहींनी विरोध देखील होतोय, काही दिवसांपूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही समान नागरी कायदा लागू करणार असल्याचे जाहीर केले. यानंतर आता मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी पुण्यातील जाहीर सभेतून पंतप्रधान नरेंद्र मोदींना देशात समान नागरी कायदा आणावा अशी विनंती केली. यापूर्वीही राज ठाकरेंनी समान नागरी कायद्याचा मुद्दा उचलून धरला होता. मात्र राज ठाकरेंच्या पुण्याच्या सभेतील विधानानंतर देशात आता पुन्हा समान नागरी कायदा लागू करण्याबाबत चर्चा सुरु झाल्या आहेत. विशेषत: भाजपशासित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांकडून समान नागरी कायदा लागू करण्यावर प्रतिक्रिया येत आहेत.

आता गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत (Chief Minister Goa Pramod Sawant) यांनी आज समान नागरी कायदा लागू करण्याबाबत भाष्य केलं आहे, अनेक भाजपशासित राज्यांमध्ये आणि विशेषतः उत्तराखंडमध्ये समान नागरी संहिता लागू करण्याबाबत सावंत म्हणाले की, "मी अभिमानाने सांगतो की, गोवा स्वतंत्र झाल्यापासून राज्यात समान नागरी संहिता लागू



आहे. मला वाटते की, समान नागरी संहिता देशातील इतर राज्यांमध्ये लागू व्हावी, असंही त्यांनी सांगितलं. त्यामुळे गोव्यात सध्या या कायद्यांतर्गत हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन अशा सर्व धर्माच्या समुदायांना लग्न, घटस्फोट, वारसदार अशा सर्व प्रकारांसाठी सारखाच कायदा लागू होतो.

दरम्यान आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा शर्मा (BJP Assam Chief Minister Himanta Biswa Sarma) यांनीही आज समान नागरी कायदा आणि मदरसे बंद करणं मुस्लिमांच्या फायद्याचं असल्याचे म्हटले आहे. जर त्यांना शिक्षणात प्रगती करायची असेल तर मुस्लिमांनी मदरश्यांपासून दूर व्हायला हवं. तुम्हाला जर धर्म शिकवायचा असेल तर ते तुमच्या घरी शिकवा. शाळेत तुम्ही फक्त विज्ञान आणि गणितच शिकायला हवं. मदरसे बंद करणं आणि समान नागरी कायदा लागू करणं हे मुस्लिमांच्या फायद्याचं आहे. अस विधान बिस्वा यांनी केलं आहे.

तर यापूर्वी उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी (Uttarakhand Cm Pushkar Singh Dhami) यांनीही राज्यात समान नागरी संहिता आणण्याच्या आपल्या वचनाचा पुनरुच्चार केला होता, हे विधान त्यांनी विधानसभा निवडणुकीपूर्वी केले होते. त्याच्या अंमलबजावणीसाठी मसुदा तयार करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात येणार असल्याचे धामी यांनी

### दरम्यान हा कायदा नेमका काय आहे जाणून घेऊ

- समान नागरी कायदा लागू केल्यास देशात लग्न, घटस्फोट, वारसाहक्क आणि दत्तक घेणे यासारखे सामाजिक विषयांवर देशभरात समान कायद्यात येतील. यात धर्माच्या आधारे स्वतंत्र न्यायालय किंवा स्वतंत्र व्यवस्था नसेल.सध्या प्रत्येक धर्मातील लोक या संबंधीत प्रकरणातील न्यायासाठी धार्मिक कायद्यांच्या आधारे न्यायालयात जातात.
- वेगवेगळ्या धर्माचे वेगवेगळे कायदे न्याययंत्रणेवरील ओझ वाढवतं आहेत. यात समान नागरी कायदा लागू झाल्यास हे ओझे हलके होईल. तसेच वर्षानुवर्षे न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या खटल्यांवर लवकरात लवकरं निर्णय देणे शक्य होईल. तसेच देशातील प्रत्येक भारतीयावर समान कायदा लागू झाल्याने देशाच्या राजकारणात सुधारणा होण्याची आशा आहे.
- कायद्यांमध्ये सुधारणा: समान नागरी कायद्यामुळे विवाह, वारसा आणि वारसाहक्क यासह विविध धर्म, जात, समुदायासंबंधित जटिल कायदे सुलभ केले जातील. हा कायदा देशातील प्रत्येक व्यक्तीसाठी लागू असेल. यात
- कोणत्याही व्यक्ती कोणत्या धर्माचा आहे याचा विचार केला जाणार नाही.
- देशात समान नागरी कायद्याची मागणी जोर धरत असून उत्तराखंड आणि उत्तर प्रदेशसह भाजपशासित राज्यांनी एकसमान धोरण तयार करण्याच्या त्यांच्या योजनांवर काम सुरू केलेय. मात्र याला ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डासह काही सामाजिक संघटनांकडून विरोध होताना दिसतोय. मात्र भाजपशासित राज्यांतील मुख्यमंत्र्याकडून आता देशात समान नागरी कायदा लागू करण्याची वातावरण निर्मिती केली जात असल्याची चर्चा सुरु आहे.

### भारतातील तेलंगणा राज्यात ओमिक्रॉन विषाणूची लागण

# चिंताजनक! ओमिक्रॉनच्या बीए-5 उपप्रकाराचा भारतात आढळला पहिला रुग्ण

### 80 वर्षी वृद्ध व्यक्तीला बीए-5 ची लागण, सध्यस्थितीत त्यांच्यावर उपचार सुरु

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

**दक्षिण** आफ्रिकेत ओमिक्रॉनच्या बीए-4 आणि बीए-5 या उपप्रकारांमुळे कोरोनाची पाचवी लाट आली होती. त्यामुळे या 80 वर्षीय वृद्ध व्यक्तीने आंतरराष्ट्रीय प्रवास केला होता का, याची तपासणी करण्यात आली. त्यावेळी त्यांनी कोणताही आंतरराष्ट्रीय प्रवास न केल्याची माहिती मिळाली. भारतातील तेलंगणा (Telangana) राज्यात ओमिक्रॉन विषाणूचा (Omicron) उपप्रकार बीए-5 लागण झाल्याचा पहिला रुग्ण आढळला आहे. एका 80 वर्षी वृद्ध व्यक्तीला बीए-5 ची लागण झाली आहे. तसेच, त्यांना सौम्य लक्षणे असल्याची माहिती समोर येत आहे. सध्यस्थितीत त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

दक्षिण आफ्रिकेत (South Africa) ओमिक्रॉनच्या बीए-4 (Omicron BA-4) आणि बीए-5 (Omicron BA-5) या उपप्रकारांमुळे कोरोनाची पाचवी लाट आली होती.



त्यामुळे या 80 वर्षीय वृद्ध व्यक्तीने आंतरराष्ट्रीय प्रवास केला होता का, याची तपासणी करण्यात आली. त्यावेळी त्यांनी कोणताही आंतरराष्ट्रीय प्रवास न केल्याची माहिती मिळाली. तसेच, बीए-5 ची लागण होण्यापूर्वी त्यांनी कोरोना प्रतिबंधक लसीचे दोन्ही डोस घेतलेले होते. याबाबत INSACOG या जिनोम सिव्केंसिंग करणाऱ्या संस्थेने पुष्टी केली आहे.

दक्षिण आफ्रिकेनंतर युनायटेड स्टेट्स (US) तसेच युरोपीय देशांमध्ये ओमिक्रॉनच्या बीए-४ आणि बीए-५ या उपप्रकराचा फैलाव पसरला होता. त्यामुळे ओमिक्रॉनच्या बीए-5 या उपप्रकाराला युरोपीय रोग नियंत्रण आणि प्रतिबंध विभागाने चिंताजनक म्हटलं आहे. शिवाय, जागतिक आरोग्य संघटनेनेही (WHO) या उपप्रकाराला


- कोरोनाच्या पार्श्वभूमीवर देशभरात मोठ्याप्रमाणात लसीकरण करण्यात आले आहे. त्यामुळे भारतात सध्या मृत्यूसंख्या वाढण्याची शक्यता नसल्याचे मत तज्ज्ञांनी सांगितले. दरम्यान, याआधी ओमिक्रॉन विषाणूच्या बीए-4 या उपप्रकाराची लागण झालेले दोन रुग्ण आढळले आहेत. यामधील एक रुग्ण हा हैदराबाद तर एक तामिळनाडू येथील आहे.

### विमानतळावर चाचणीदरम्यान निदान...

- हैदराबाद येथील रुग्ण दक्षिण आफ्रिकेमधून प्रवास करुन आला होता. विमानतळावर आल्यानंतर त्याची चाचणी करण्यात आली होती. त्यावेळी त्याला बीए-4 या उपप्रकाराची लागण झाल्याचे समोर आले. तसेच, तामिळनाडू येथील रुग्ण ही 19 वर्षीय महिला आहे.

# बिग बॉस ओटीटीमध्ये एन्ट्री, मालिकेतून एक्झिट?

अभिनेत्री मुनमुन दत्ता 'तारक मेहता का उलटा चष्मा' हि मालिका सोडणार का ? मागच्या काही दिवसांपूर्वी या मालिकेतील तारक मेहता हे पात्रं साकारणारा अभिनेता शैलेश लोढा याने सुद्धा मालिका सोडली असे वृत्त समोर आले होते.



संपूर्ण देशभरातच 'तारक मेहता का उलटा चष्मा' (TAARAK MEHTA KA OOLTAH CHASHMAH) या हिंदी मालिकेने स्वतःचा एक वेगळा चाहता वर्ग निर्माण केला आहे. या मालिकेतील कलाकार आणि त्यांनी साकारलेल्या व्यक्तिरेखा यासुद्धा प्रत्येकाच्याच पसंतीस उतरल्या आहेत. या मालिकेतील बबिता (BABITA) हे पात्रंसुद्धा प्रेक्षकांच्या पसंतीस उतरलं, पण आता या मालिकेत बबिता हे पात्र साकारणारी अभिनेत्री मुनमुन दत्ता (MUNMUN DUTTA) हीसुद्धा मालिका सोडून बिग बॉस ओटीटीच्या पुढल्या पर्वात झळकणार असल्याच्या चर्चा होत आहेत.

या मालिकेतील दयाबेन हे पात्रं साकारणारी अभिनेत्री दिशा वकानी हिने काही वर्षांपूर्वी तारक मेहता का उलटा चष्मा ही मालिका सोडली आणि त्यानंतर इतर काही कलाकारांनीही ही मालिका सोडली मागच्या काही दिवसांपूर्वी या मालिकेतील तारक मेहता हे पात्र साकारणारा अभिनेता शैलेश लोढा(SHAILESH LODHA) याने सुद्धा मालिका सोडली, असे वृत्त समोर आले होते. आणि आता अभिनेत्री मुनमुन दत्ता (MUNMUN DUTTA) हीसुद्धा मालिका सोडणार आहे, असं म्हटलं जात आहे.


**टीना खूपच हॉट दिसते**

या फोटोंमध्ये अभिनेत्री ऑफ व्हाइट कलरची अतिशय खोल गळ्याची मोनोकिनी परिधान करताना दिसत आहे. अभिनेत्रीने न्यूड मेकअप आणि विंक आय लाइनर लावल्यानं तिचं रूप झळाळून निघालंय. यादरम्यान अभिनेत्रीने पोनीटेल बनवून केस बांधले आहेत. त्याचबरोबर तिने कानात सोन्याचे झुमके घातले आहेत. या लूकमध्ये ती खूपच सेक्सी आणि हॉट दिसत आहे.

**चाहत्यांनी कौतुकाचे पूल बांधले**

आता केवळ टीनाचे चाहतेच नाही तर इतर सोशल मीडिया वापरकर्तेही तिच्या अवतारावरून आकर्षित झालेत.

# 'संस्कारी बहू' टीना दत्ताने बोल्डनेसच्या सर्व मर्यादा ओलांडल्या



'उतरन' या टीव्ही शोने घराघरात पोहोचलेली अभिनेत्री टीना दत्ता ही सध्या वेगळ्याच कारणानं चर्चेत आहे. तिने फार कमी वेळात आपल्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांच्या हृदयात एक खास स्थान निर्माण केले आहे. आज तो अशा वळणावर आहे की, लोक त्याच्या दर्शनासाठी आतुर आहेत. अभिनेत्री देखील या प्रकरणात तिच्या चाहत्यांना कधीही निराश करत नाही.

टीनाने तिचा मोनोकिनी लूक केला शेअर टीनाला पडद्यावर नेहमीच सुसंस्कृत सून आणि मुलगी म्हणून पाहिले जाते. मात्र, खऱ्या आयुष्यात ती खूप बोल्ड आहे, ज्याची झलक तिच्या इंस्टाग्राम पेजवर अनेकदा पाहायला मिळते. आता पुन्हा टीनाने तिच्या लेटेस्ट फोटोशूटची झलक चाहत्यांसोबत शेअर केली आहे. त्याचवेळी तिचा हा अवतार पाहिल्यानंतर टीनाचा बोल्डनेस काळाच्या ओघात वाढत चालला आहे, असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही.

# चुलबुल पांडेचं स्वप्न पूर्ण झालं

**सलमान खानच्या दबंग सिनेमातला पोलीस इन्स्पेक्टर चुलबुल पांडे भलताच लोकप्रिय झाला होता. आता सरकारच्या एका निर्णयावर सल्लूमियाँनं चुलबुल पांडेचं नाव घेऊन आनंद व्यक्त केला आहे.**

मुंबई : बॉलिवूड सुपरस्टार सलमान खान आपल्या सिनेमांमुळे नेहमीच चर्चेत असतो. त्याच्या सिनेमातल्या त्यानं साकारलेल्या व्यक्तिरेखा कुणी विसरूच शकत नाही. सलमाननं केंद्र सरकारनं घेतलेल्या एका पुढाकारावर आनंद व्यक्त केला आहे. केंद्र सरकारनं ठरवलं आहे, की पूर्ण भारतभर पोलिसांनी लोकांशी मित्रत्वाचे संबंध विकसित करायचे. पोलीस दल पिपल फ्रेंडली ठेवायचं. यावर सलमान खाननं आपली उत्स्फूर्त प्रतिक्रिया दिली आहे. देशात पोलिसांची प्रतिमा सुधारण्यासाठी कॅपिसिटी बिल्डिंग कमिशनचे एक सदस्य प्रवीण परदेशी यांनी एक पोस्ट शेअर केली आहे. त्यात म्हटलंय की, कशा पद्धतीनं समस्यांचं निवारण केलं जाईल. या पोस्टला ट्वीट करत सलमान खाननं लिहिलंय, 'भारत सरकारनं संपूर्ण भारतात पोलिसांनी लोकांशी अधिक मित्रत्वानं वागावं, म्हणून मोठी सुरुवात केली आहे. आता चुलबुल पांडेचं स्वप्न खरं झालं.' दबंग सिनेमात सलमान झालेला चुलबुल पांडे सलमान खाननं दबंग सिनेमात चुलबुल पांडेची भूमिका साकारली आहे. हा पोलीस अधिकारी आहे. लोकांवर झालेल्या अन्यायाला वाचा फोडतो. त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी दोन हात करतो. सलमानची ही व्यक्तिरेखा प्रेक्षकांना आवडली. दबंग सीरिजमध्ये ३ सिनेमे झालेत. तीनही सुपरहिट झालेत.



# कार्तिकने घेतला कंगनाशी पंगा



20 मे रोजी शुक्रवारी बॉक्स ऑफिसवर 'धाकड' आणि 'भूल भुलैया2' हे दोन्ही सिनेमा एकत्र धडकले. मात्र कार्तिक आर्यनच्या सिनेमाने कमाईच्या बाबतीत कंगनाला मागे टाकलं आहे. 13.50 कोटी रुपयांची आकडेवारी गाठत कार्तिकने सुरुवात केली. विकेंडच्या दुसऱ्या दिवशी 'भुल भुलैया2' चा इन्कम रेट हा 35 टक्क्यांनी वाढला. यावेळी कमाईचा आकडा हा 18 कोटी रुपयांपर्यंत पोहोचला.

**कंगनाच्या 'धाकड'ला कमी प्रतिसाद**

दरम्यान कंगना रनौतच्या 'धाकड' सिनेमाची जोरदार चर्चा रंगली होती. मात्र बॉक्स ऑफिसवर हा हवा तसा करिष्मा दाखवू शकला नाही. मीडिया रिपोर्टनुसार पहिल्या दिवशी धाकड सिनेमाने 1 कोटी आणि दुसऱ्या दिवशी फक्त 75 लाख रुपये कमाई केली आहे. मात्र कंगनाने सोशल मीडियाच्या माध्यमातून उदार मनाने कार्तिक आर्यन आणि अभिनेत्री कियारा अडवाणीला मनापासून शुभेच्छा देखील दिल्या आहेत.

# भाषा नव्हे, तर चित्रपटाची ताकद पाहिली-करण जोहर




मागच्या काही दिवसांत बॉलिवूडमध्ये अनेक चित्रपट प्रदर्शित झाले आहेत. त्यातले काही चित्रपट फ्लॉप ठरले तर काही हिट झाले होते. तर काही बॉलिवूडमधले बिग बजेट चित्रपट हे प्रदर्शित होण्याच्या मार्गावर आहेत. बॉलिवूडमधला प्रसिद्ध दिग्दर्शक करण जोहर याचा 'जुग जुग जियो' (JUG JUGG JEEYO) हा चित्रपटसुद्धा प्रदर्शनाच्या वाटेवर आहे. या चित्रपटाचा ट्रेलर लॉंच सोहळा नुकताच संपन्न झाला आणि सोशल मीडियावर त्याची चर्चासुद्धा रंगली आहे. या चित्रपटात कियारा अडवाणी (KIARA ADVANI) आणि कार्तिक आर्यन (KARTIK AARYAN) यांची मुख्य भूमिका आहे. या चित्रपटाच्या ट्रेलर लॉंच सोहळ्यादरम्यान बॉलिवूड विरुद्ध साऊथ वादावर करण जोहरने स्वतःचं स्पष्ट मत मांडलं आहे.

मागच्या काही दिवसांत बॉलिवूड चित्रपटसृष्टी विरुद्ध साऊथ चित्रपट सृष्टी, असा वादंग निर्माण झाला होता. दोन्ही बाजूच्या अनेक कलाकारांनी विविध प्रतिक्रिया दिल्या होत्या. त्यातील काही म्हणजे दाक्षिणात्य अभिनेता महेश बाबू (MAHESH BABU) याने सुद्धा बॉलिवूडबद्दल चुकीचं विधान केलं होतं, त्यापाठोपाठ अभिनेता किचा सुदीप (KICHHA SUDIP) सुद्धा या वादात आला होता. दरम्यान या सगळ्या वादावर बॉलिवूड दिग्दर्शक करण जोहर यानेसुद्धा आपलं स्पष्ट मत मांडलं आहे. कारण त्याच्या आगामी चित्रपट 'जुग जुग जियो' (JUGG JEEYO) या चित्रपटाच्या ट्रेलर लॉंच सोहळ्यावेळी त्याला प्रश्न विचारले असता म्हणाला, की 'हिंदी चित्रपटांमध्ये आणि साऊथ चित्रपटांमध्ये कोणत्याच प्रकारची स्पर्धा नाही. 'बाहुबली' (BAHUBALI) चित्रपटाची ज्यांनी निर्मिती केली त्या निर्मितीमध्ये माझाही सहभाग होता. त्यावेळी मी भाषा नाही तर चित्रपटाची ताकद पहिली आणि त्यावर विश्वास ठेवला. त्यामुळे कोणत्याच प्रकारची स्पर्धा नाही, आपल्याला एकत्र पुढे जायचं आहे.'

## शॉर्ट न्यूज »

### 'फिफा','एएफसी' शिष्टमंडळाचा जूनमध्ये भारतात आढावा दौरा



नवी दिल्ली । महाईन्यूज

सर्वोच्च न्यायालयाने नेमलेल्या प्रशासकीय समितीकडून सध्या अखिल भारतीय फुटबॉल महासंघाचा दैनंदिन कारभार पाहिला जात आहे. 'फिफा' आणि आशियाई फुटबॉल महासंघाचे (एएफसी) संयुक्त शिष्टमंडळ संघटनात्मक परिस्थितीची पाहणी करण्यासाठी भारतात येणार आहे. 'फिफा' आणि 'एएफसी' शिष्टमंडळाचा भारत दौरा जूनमध्ये असून, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर फुटबॉल संघटनेची सद्य:स्थिती समजून घेणे, हा मुख्य उद्देश आहे. "सरकारी किंवा न्यायालयीन हस्तक्षेपामुळे संघटनेवर बंदी येऊ शकते. परंतु भारतावर बंदी येणार नाही. कारण आम्ही येथील स्थितीची आणि धोरणाची योग्य कल्पना या अधिकाऱ्यांना देऊ," असे भारतीय फुटबॉल महासंघाच्या सूत्रांनी सांगितले. भारतीय फुटबॉल संघटनेशी संलग्न असलेल्या २५ राज्य संघटनांनी शनिवारी आभासी (ऑनलाइन) बैठकीत सद्य:स्थितीबाबत चर्चा केली. "भारतावर बंदी घालू नये.

### भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने संघाची घोषणा केली

# भारत-दक्षिण आफ्रिका टी-20 सामन्यासाठी भारतीय संघाची घोषणा

### संघाच्या कर्णधार पदाची जबाबदारी केएल राहुलकडे

। नवी दिल्ली । महाईन्यूज

। प्रतिनिधी ।



**भारत-दक्षिण आफ्रिका यांच्यात 9 जून पासून पाच सामन्यांच्या टी-20 मालिकेला सुरुवात होणार आहे. या मालिकेपूर्वी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने संघाची घोषणा केली आहे. या संघाच्या कर्णधार पदाची जबाबदारी केएल राहुलकडे सोपवण्यात आली आहे. संघात ऑलराऊंडर हार्दिक पांड्याचा समावेश करण्यात आला आहे. तर उम्रान मलिक आणि अर्शदीप सिंह यांना टीम इंडियाच्या टी20 संघात पहिल्यांदाच संधी देण्यात आली आहे.**

#### ही असेल टीम –

आता आयपीएलचा हंगाम सुरू आहे. आयपीएलची फायनल 29 मे रोजी पार पडणार आहे. यानंतर लगेच भारतीय खेळाडू दक्षिण अफ्रिकेविरुद्ध खेळणार आहेत. दक्षिण आफ्रिकेचा संघ भारताच्या दौऱ्यावर येणार असून यावेळी 5 टी20 सामने खेळवले जाणार आहेत. या संघात केएल राहुल (कर्णधार), ऋतुराज गायकवाड, दीपक हुडा, श्रेयस अय्यर, ऋषभ पंत (विकेटकीपर), दिनेश कार्तिक, हार्दिक पंड्या, वेंकटेश अय्यर, युझवेंद्र चहल, कुलदीप यादव, अक्षर पटेल, रवी बिश्नोई, भुवनेश्वर कुमार, हर्षल पटेल, आवेश खान, अर्शदीप सिंह, उम्रान मलिक यांचा समावेश आहे.

#### येथे होणार सामने –

दक्षिण आफ्रिके विरुद्धचे सामने 9 जूनला पहिला सामना दिल्लीच्या अरुन जेटली स्टेडीयम वर होणार आहे. यानंतर दुसरा सामना 12 जनू बाराबती स्टेडियम कट्टक, तिसरा सामना 14 जून डॉ एस वाय राजशेखर रेड्डी एसीए व्हिडीसीए क्रिकेट स्टेडियम विशाखापट्टणम,चौथा सामना 17 जूनला सौराष्ट्र क्रिकेट असोसीएशन स्टेडियम राजकोट, पाचवा सामना 19 जून एम. चिन्नस्वामी स्टेडियम बंगळुरु येथे होणार आहे.

# मुंबईच्या संघातून अर्जुन तेंडुलकर बाहेर

### संघाबाहेर काढण्याचे कारण मात्र अस्पष्ट

मुंबई । महाईन्यूज



मुंबईच्या चाहत्यांना अर्जुन तेंडुलकर नेमका कधी खेळणार, याची उत्सुकता लागलेली होती. पण आता तर अर्जुन हा मुंबईच्या संघातून बाहेर गेल्याचे समोर आले आहे. मुंबई इंडियन्सच्या संघाने गेल्यावर्षी २० लाख एवढी किंमत मोजून अर्जुनला आपल्या संघात स्थान दिले होते. पण त्याले गेल्या हंगामात एकही संधी दिली नाही. त्यानंतर या वर्षी झालेल्या मेगा लिलावातही अर्जुनला २० लाख रुपये मोजत मुंबई इंडियन्सच्या संघाने आपल्या ताफ्यात दाखल केले होते. या हंगामात तर मुंबई इंडियन्सचा संघ सलग ९ सामने पराभूत झाला होता आणि त्याचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले होते. त्यानंतर मुंबईच्या संघाने बरेच प्रयोग केले आणि युवा खेळाडूंना संधी दिली. पण यावेळी त्यांनी अर्जुनला एकदाही खेळण्याची संधी दिली नाही. अर्जुनचे सराव करतानाचे व्हिडिओ चांगलेच व्हायरल होत होते, पण त्याला खेळण्याची एकही संधी दिली नाही. त्यामुळे अर्जुन ट्रोल होत असल्याचेही पाहायला मिळाले होते. त्यामुळे आता पुढच्या मोसमात तरी मुंबई इंडियन्स अर्जुनला संधी देणार की नाही, अशी जोरदार चर्चा सुरु होती.

आयपीएलच्या साखळी फेरीतील सामने आता संपले आहेत, त्यानंतर मुंबईच्या रणजी संघाने आपली टीम जाहीर केली आहे. रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेचे आता बाद फेरीचे सामने रंगणार आहेत. या बाद फेरीसाठी भारताचे माजी वेगवान गोलंदाज सलील अंकोला यांच्या निवड समितीने आज मुंबईचा संघ जाहीर केला. या संघात अर्जुनला संधी दिली नसल्याचे समोर आले आहे.

मुंबईचा रणजी संघ : पृथ्वी शॉ (कर्णधार), यशस्वी जैस्वाल, भुपेन लालवानी, अरमान जाफर, सर्फराझ खान, सुवेद पारकर, आकर्षित गोमेल, आदित्य तरे, हार्दिक तामोरे, अमन खान, साईराज पाटील, शम्स मुलानी, द्रुमिल मटकर, तनुश कोटियन, शशांक अतार्डे, धवल कुलकर्णी, तुषार देशपांडे, मोहित अवस्थी, रॉयस्टन डायस, सिद्धार्थ राऊ, मुशीर खान.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही